# पनवेल महानगरपालिका

उत्सवाच्या वेळी रस्त्यावर उभारण्यात येणारे तात्पुरत्या स्वरुपातले मंडप / स्टेज यामुळे रहदारीस अडथळा न होऊ देणे तसेच ध्वनीप्रदुषणाबाबत व अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग पोस्टर्स यासंदर्भात नागरीकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी प्रभाविरित्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी निश्चित करण्यात आलेली

## -: मार्गदर्शक तत्वे :-

- मा. सर्वोच्च न्यायालयातील न्याय निवाडा Supreme Court ३६०,
- मा. उच्च न्यायालयाने जनहित याचीका क्र. १७३/२०१०
- मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५५/२०११
- महाराष्ट्र विरुपण कायदा, १९९५ मध्ये दिलेले निर्देश.

# अनुक्रमणिका


| अ.न. | विषय | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १. | प्रस्तावना | ०१ |
| २. | मार्गदर्शक तत्वे | २ ते ३ |
| ३. | ध्वनी प्रदुषण नियंत्रण व नियमन २००० अन्वये पनवेल महानगरपालिका क्षेत्रात जाहिर करण्यात आलेले शांतता क्षेत्र अधिसुचना २०१२ | ४ |
| ४. | मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५५/२०११ महाराष्ट्र विरुपण कायदा, १९९५ | ५ ते ६ |

# प्रस्तावना

आयुक्त

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात गणेशोत्सव, दहीहंडी, नवरात्र, रमजान महिना, बकरी ईद, मोहरम, नाताळ, १४ एप्रिल (डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती), ६ डिसेंबर (महानिर्वाण दिन), व इतर सर्व धार्मिक उत्सव / सण रस्त्यावर साजरे केले जातात. या उत्सवा दरम्यान मंडप उभारण्यासाठी विविध संस्था मोठ्या प्रमाणात महापालिकेकडे अर्ज करीत असतात. महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम २३४ अन्वये मा. पोलिस आयुक्त यांच्या संमतीने रस्त्यावर मंडप उभरण्यासाठी व कलम २४४,२४५ ने जाहिरात फलक लावणेस मा. आयुक्त परवानगी देऊ शकतात.

सार्वजनिक उत्सवाच्या वेळी बहुतेक मंडळेही महानगरपालिकेच्या वाहतुकीच्या रस्त्यावर मंडप उभारणी करतात अशावेळी परिसरात असलेल्या नागरीकांना तसेच वाहीतुकीस अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. सार्वजनिक उत्सवांमध्ये तात्पुरत्या स्वरुपात बांधलेल्या मंडपाचा अडथळा होऊ नये, तसेच सार्वजनिक उत्सवही साजरे करता यावेत व परिसरातील नागरीक व रहदारीला कमीत कमी त्रास व्हावा या दृष्टीकोनातुन वेळोवेळी पनवेल महानगरपालिकेने मार्गदर्शक तत्वे व कार्यालयीन पध्दती तयार केलेली आहे.

डॉ. महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये मा. उच्च न्यायालयाने सार्वजनिक उत्सव साजरे करताना रहदारीस अडथळा होणार नाही तसेच ध्वनीक्षेपकामुळे होणारे प्रदुषण नियंत्रित करणेचे आदेश दिलेले आहेत.

तसेच डॉ. महेश बेडेकर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर जनहित याचिका क्र. १५५/२०११ मध्ये वेळोवेळी दिलेल्या आदेशात सार्वजनिक / खाजगी जागेवर, इमारतींवर, विद्युत पोल इ. ठिकाणी लावण्यात आलेले अनधिकृत/ विनापरवानगी जाहिरात, होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. तातडीने काढुन घेणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार महापालिकेमार्फत जाहिरात/ होर्डिंग काढण्याची कारवाई करणेत येते. याबाबत सर्व राजकीय पक्षांनी/ नागरीकांनी महापालिकेस सहकार्य करावे व नागरीकांसाठी तक्रार स्विकारण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

त्या अनुषंगाने सण साजरे करताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही , ध्वनी प्रदुषण होणार नाही, रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही व अनधिकृत जाहिरात, होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर, फलक इ.करीता मा. उच्च न्यायालयाने घालुन दिलेल्या नियमांचे सार्वजनिक मंडळ, राजकिय पक्ष,नागरीक यांचेकडुन उचित पालन होण्यासाठी पनवेल महानगरपालिकेतर्फे जनभावनांचा मान राखुन आणि जनजीवन विस्कळीत होऊ न देता जनहितार्थ मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आलेली आहेत. तसेच सदर प्रकरणी नागरीकांच्या तक्रारी स्विकारण्यासाठी तक्रार निवारण व्यवस्था निर्माण केलेली असून, सदर सुविधेस उचित प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मार्गदर्शक तत्वांमुळे सार्वजनिक उत्सव शांततेत, सुरळीत व जनजीवन विस्कळीत न होता साजरे करण्यास निश्चितच मदत होईल असा विश्वास आहे.

(मंगेश चितळे)
आयुक्त
पनवेल महानगरपालिका

# मार्गदर्शक तत्वे

## अर्ज सादर करण्याची पध्दती

- सार्वजनिक उत्सवाच्या प्रसंगी रस्ता / सार्वजनिक ठिकाणी मंडप / स्टेज इ. उभारण्यास परवानगी मिळणेबाबत संबंधित मंडळाने विहित नमुन्यात सार्वजनिक उत्सवाच्या ३० दिवस अगोदर उपायुक्त (परवाना विभाग) यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.
- संबंधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप / स्टेज इ. उभारण्यासाठी रस्त्याच्या ¼ भागापेक्षा अधिक असणार नाही व सार्वजनिक वाहतुकीस अडथळा होणार नाही व मंडळाने घ्यावयाची आहे. मंडप / स्टेज इ. उभारणेकरीता प्रचलित आकाराचा तक्ता खालीलप्रमाणे –

| रस्त्याची रुंदी | मंडप / स्टेजसाठी दिली पाहिजे अशी कमाल रुंदी | मोकळी / खुली असली पाहिजे अशी रस्त्याची रुंदी |
|---|---|---|
| २५ फुट | ६.२५ फुट | १८.७५ फुट |
| ५० फुट | १२.५ फुट | ३७.५ फुट |
| ७० फुट | १७.५ फुट | ५२.५ फुट |

## ना हरकत दाखला

- संबंधित मंडळाने मागणी केलेल्या ठिकाणी मंडप / स्टेज इ. उभारणेकरीता परवानगी देणेपूर्वी शहर वाहतुक पोलीस शाखा, स्थानिक पोलीस स्टेशन व महानगरपालीकेच्या अग्निशमन विभाग यांचे ना हरकत दाखला तीन दिवसाचे आत सादर करणे आवश्यक आहे.

## पूर्व इतिहास

- मागील वर्षी ज्या मंडळांना मंडप /स्टेज इ. उभारणेसाठी ज्या जागेवरी परवानगी देण्यात आली होती, त्याच जागेवर अर्जाच्या वेळी परवानगी देण्यात येईल. परंतू प्रशासकिय आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका सदर बाबींमध्ये योग्य तो बदल करु शकते.
- मागील वर्षी ज्या आकाराचा मंडप / स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात आली होती, तेवढ्याच आकाराचा किंवा रस्त्याच्या ¼ भाग यांपैकी जे कमी असेल त्या आकारचा मंडप / स्टेज इ. उभारणेसाठी परवानगी देण्यात येईल. पनवेल महानगरपालिका आवश्यकतेनुसार मंडप उभारण्याची परवानगी द्यावी किंवा नाही या बाबत स्वेच्छाधिकार अबाधित ठेवत आहे. तसेच मंडप / स्टेज आकार कमी करण्याचे निर्देशसुध्दा मंडळांना देऊ शकते.

## कायदेशीर तरतुद

- महापालिकेने परवानगी दिल्यानुसारच मंडप / स्टेज इ. उभारणे संबंधित मंडळाला बंधनकारक आहे. परवानगी व्यतिरिक्त संबंधित मंडळाने मंडप / स्टेज इ. उभारलेले निदर्शनास आल्यास ते संबंधित प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त, पोलिस अधिका-यांच्या मदतीने काढून टाकतील व संबंधितांवर योग्य ती

कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच महानगरपालिकेने दिलेल्या सुचनेनुसार मंडप / स्टेज नसल्यास सदरचा मंडप / स्टेज पनवेल महानगरपालिका पूर्वसूचना न देता काढू शकते.

- पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडीन शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१०/प्र.क्र.१०६/ता.क्र.३ दिनांक ०३/०५/२०११ अन्वये दिलेल्या निर्देशांप्रमाणे सार्वजनिक उत्सव साजरे करणारी मंडळे यांचेकडून सर्व नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे.

## दक्षता

- ज्या प्रस्तावित मंडप / स्टेज इ. उभारणीची जागा ही परिवहन सेवेच्या बस मार्गावर असेल त्या रस्त्यावर मंडप / स्टेज इ. उभारणेकरीता किमान १२ फुट रुंद जागा ही बसेस, रिक्षा व सार्वजनिक वाहतुकीतील ट्रॅककरिता उपलब्ध राहील. याची दक्षता घेण्यात यावी.
- संबंधित मंडळाने मंडप / स्टेज इ. यांची उभारणी करताना ते रोड जंक्शनपासून किमान रस्त्याच्या रुंदीच्या अर्धे याप्रमाणे जंक्शनपासून लांब राहील. जेणेकरुन वाहने वळविणे सोपे होईल अशा पध्दतीने कार्यवाही करावी.
- संबंधित मंडळाने मंडप / स्टेज इ. उभारणी करण्यासाठी कोणत्याही ठिकाणाचा सिमेंट कॉक्रीट रस्ता अथवा पॅसेज असलेल्या पृष्ठभागावर खोदाई करण्याकरीता परवानगी देण्यात येणार नाही. अशा ठिकाणी मंडप घालावयाचे झाल्यास वाळूने भरलेल्या ड्रमवर मंडप / स्टेज इ. याकरीता बांबू रोवण्यात यावेत. रस्ते / सार्वजनिक खोदाई करुन मंडप / स्टेज इ. उभारणी केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित मंडळावर रस्ते अनाधिकृतपणे खोदाईबाबत केल्याचे निदर्शनास कारवाई करण्यात येईल.
- ज्या ठिकाणी पक्क्या स्वरुपाचे रस्ते दुभाजक आहेत अशा ठिकाणी पदपथ व दुभाजक यामधील रस्त्याच्या भागातील १२ फुटाव्यतिरीक्त उर्वरित जागेत मंडपाची उभारणी संबंधित मंडळाने करावी.
- कोणत्याही ठिकाणी ८ फुट व त्यापेक्षा कमी असलेल्या रस्त्याच्या जागेत मंडप / स्टेज इ. उभारणीकरीता परवानगी महानगरपालिकेकडून देण्यात येणार नाही. मंडप / स्टेज इ. अतंर विद्युत तार व डी.पी. बॉक्स पेक्षा ६ फुट अंतरावर ठेवणे संबंधित मंडळांना बंधनकारक आहे.
- सार्वजनिक उत्सवांकरीता आवश्यक विद्युत कनेक्शन महापालिकेच्या कोणत्याही रस्त्यावरील विद्युत पोल मधून घेता येणार नाही असे आढळून आल्यास संबंधित मंडळावर दंडात्मक कारवाई त्यांची परवानगी रद्द करण्यात येईल.
- संबंधित मंडळांला महानगरपालिकेने परवानगी दिलेल्या जागी उभारण्यात आलेल्या मंडपापासून जास्तीत जास्त १५ मीटर अंतरापर्यंतच विद्युत रोषणाई करता येईल.

## परवानगी कालावधी

- सार्वजनिक रस्ते तात्पुरते व्यापण्यासाठी किंवा त्यावर उभारणी करण्यासाठी सर्वसामान्यपणे खाजगी उत्सव किंवा समारंभ यांच्याबाबतीत पाच दिवस किंवा सार्वजनिक उत्सव किंवा समारंभ यांच्या बाबतीत पंधरा दिवस ह्यापेक्षा जास्त कालावधीसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

## ध्वनी प्रदुषण तक्रारींबाबत कार्यपध्दती

- सार्वजनिक ठिकाणी वातावरणात दिवसेंदिवस ध्वनीची तिव्रता औद्योगिक कामे, विविध प्रकारची बांधकामे, जनित्रे (जनरेटर्स) ध्वनीवर्धक (लाऊड स्पीकर्स), सार्वजनिक सभा, संगीत वाद्ये, वाहनांचे भोगे व इतर यांत्रिक साधनामुळे ध्वनीचे प्रमाण वाढतच आहे. ध्वनी प्रदुषणामुळे नागरीकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे तसेच वातावरणातील ध्वनीची योग्य पातळी राखण्याच्या हेतूने ध्वनी निर्माण करणा-या स्त्रोतांचे नियमन व नियत्रंण करणे आवश्यक असल्याने महाराष्ट्र शासनान शासन निर्णय दि. २१ एप्रिल २००९ अन्वये ध्वनी प्रदुषण (नियंत्रण व नियमन) नियम २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.
- बांधकाम प्रकल्पाच्या ठिकाणी ध्वनी प्रदुषण करणारी उपरकरणे / स्त्रोत जसे डी. जी. सेटस, जनरेटर सेट्स इमारतीसाठी वापरण्यात येणा-या संविधा, घरगुती उपकरणे इत्यादींची सभोवतालच्या हवेतील ध्वनी प्रदुषण गुणवत्ता खाली नमुद केल्याप्रमाणे असेल.
- आवाजाच्या संबंधीत सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा.

| **क्षेत्र सांकेतांक** | **क्षेत्र/ झोन प्रवर्ग** | **डेबि (ए) एल ईक्यू दिवसा** | **मधील मर्यादा रात्री** |
|---|---|---|---|
| (अ) | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| (ब) | वाणिज्यिक क्षेत्र | ६५ | ५५ |
| (क) | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| (ड) | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

**टीप**

१. दिवसा म्हणजे सकाळी ६.०० ते रात्री १०.०० पर्यंत

२. रात्री म्हणजे रात्री १०.०० ते सकाळी ६.०० पर्यंत शांतता क्षेत्र म्हणजे रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवा सक्षम प्राधिकरणाने अशी क्षेत्रे म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही क्षेत्रे यांच्या सभोवतालाच्या १०० मीटरपर्यंतच्या क्षेत्रात समावेश असलेली क्षेत्रे.

३. संमिश्र क्षेत्र हे वर नमुद केलेल्या चारांपैकी एक क्षेत्र असल्याचे सक्षम प्राधिकरणाद्वारे घोषित करण्यात येईल.

- ध्वनी प्रदुषणाच्या प्राप्त झालेल्या तक्रारींची नोंद ठेवण्यासाठी स्वतंत्र नोंदवहीची व्यवस्था केलेली आहे. प्राप्त झालेली ध्वनी प्रदूषणाची तक्रार कार्यवाहीसाठी संबंधित पोलिस स्टेशनला व पोलिस कंट्रोल रुमला अग्रेषीत येणार आहे.

- **शातंता क्षेत्र जाहिर करणे :**

  मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल यांनी शांतता क्षेत्र अधिसुचना क्रमांक महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग-१ अ दि. ०४ सप्टेंबर २०१८ अन्वये घोषित केलेली आहे.



❖ **अनधिकृत जाहिरात फलक :-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १५५/२०११ मध्ये वेळोवेळी दिलेल्या आदेशात सार्वजनिक / खाजगी जागेवर, इमारतींवर, विद्युत पोल इ. ठिकाणी लावण्यात आलेले अनधिकृत/ विनापरवानगी जाहिरात, होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. तातडीने काढुन घेणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार महापालिकेमार्फत जाहिरात/ होर्डिंग काढण्याची कारवाई करणेत येईल. तसेच सर्व राजकीय पक्षांनी/ नागरीकांनी त्या साठी महापालिकेमार्फत सहकार्य करावे.

- **तक्रार निवारण व्यवस्था :**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पनवेल महानगरपालिकेने सार्वजनिक उत्सवाच्यावेळी अनाधिकृतरित्या उभारेलेल्या मंडपा व अनधिकृत जाहिरात, होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. बाबत तसेच ध्वनी प्रदूषणाबाबत, नागरिकांच्या तक्रारी स्वीकारणासाठी सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली आपत्कालीन विभागाची टोल फ्री नंबर , ई-मेल सुविधा, एस.एम.एस. सुविधा खालीलप्रमाणे उपलब्ध केलेली आहे व त्यांस उचित प्रसिध्दी देण्यात येत आहे. नागरिकांना नावांनिशी किंवा निनावी तक्रार नोंदविण्याकरिता पनवेल महानगरपालिकेने खालील प्रमाणे टोल फ्री नंबर सुरु केले आहेत ते पुढील प्रमाणे.

**पोलिस कंट्रोल रुम क्रमांक :- ०२२२७४५२३३३**
**टोल फ्री क्रमांक :- १८००२२७७०१**
**लघूसंदेश व व्हॉट्सअॅप क्रमांक:-९७६९०१२०१२**
**ई-मेल - panvelcorporation@gmail.com**

| अ.क्र. | तक्रारीचे स्वरुप | सक्षम प्राधिकारी यांचे फोन नंबर |
|---|---|---|
| १. | ध्वनी प्रदुषण | **स्थानिक पोलिस स्टेशन:-**<br>१.खारघर पोलिस स्टेशन:-<br>२.तळोजे पोलिस स्टेशन:-<br>३.कळंबोली पोलिस स्टेशन:-<br>४. पनवेल पोलिस स्टेशन:-<br>५.नविन पनवेल पोलिस स्टेशन:-<br>६.खांदा कॉलनी पोलिस स्टेशन:- |
| २. | वाहतुक व्यवस्था | **वाहतुक पोलिस शाखा:-**<br>१.खारघर पोलिस स्टेशन:-<br>२.तळोजे पोलिस स्टेशन:-<br>३.कळंबोली पोलिस स्टेशन:-<br>४. पनवेल पोलिस स्टेशन:-<br>५.नविन पनवेल पोलिस स्टेशन:-<br>६.खांदा कॉलनी पोलिस स्टेशन:- |
| ३. | मंडप व अनधिकृत जाहिरात संदर्भात | **संबंधित प्र. प्रभाग अधिकारी तथा पदनिर्देशित अधिकारी**<br>१.प्र. प्रभाग अधिकारी , प्रभाग "अ" :-<br>२.प्र. प्रभाग अधिकारी , प्रभाग "ब" :-<br>३.प्र. प्रभाग अधिकारी , प्रभाग "क" :-<br>४.प्र. प्रभाग अधिकारी , प्रभाग "ड" :- |

- वरील प्रमाणे आदेश आपत्कालीन विभागाला दिलेले असून सर्व सहा. आयुक्त व सर्व विभागप्रमुख, सर्व उपआयुक्त, अतिरिक्त आयुक्त यांना उचित कार्यवाही साठी अगेषित केलेले आहे.
- ध्वनी प्रदुषण तसेच इतर प्रदुषण होणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी मंडळाची राहील.
- पोलिस, वाहतुक यंत्रणा, शासन यंत्रणा यांनी दिलेले सर्व निर्देश यांचे काटेकोर पालन करणे मंडळास बंधनकारक राहील.

# पनवेल महानगरपालिका

ध्वनी प्रदुषण नियम २००० मधील नियम ७ नुसार महापालिका क्षेत्रात ध्वनी प्रदुषण नियमांच्या उल्लंघनाच्या तक्रारीसंदर्भात तसेच सण, उत्सवांच्यावेळी रस्त्यावर, पदपथावर विना परवानगी उभारण्यात येणा-या मंडप / स्टेज यासंदर्भातील तक्रारी स्विकारणेसाठी खालिलप्रमाणे तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

**पोलिस कंट्रोल रुम क्रमांक: ०२२२७४५२३३३**
**महापालिका टोल फ्री क्रमांक : १८००२२७७०१**
**लघूसंदेश व व्हॉट्सॲप क्रमांक : ९७६९०१२०१२**
**ई-मेल:panvelcorporation@gmail.com**